असा. क्र. ३२९ रजिस्टर्ड नं. टीईसीएच/४७-३०३/एमबीआय/२००३-०५

# महाराष्ट्र शासन राजपत्र

**असाधारण**

**प्राधिकृत प्रकाशन**

**सोमवार, डिसेंबर २९, २००३/पौष ८, शके १९२५**

स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी या भागाला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.

## भाग चार-ब

**महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले (भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

### महसूल व वन विभाग

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक २९ डिसेंबर २००३

### आदेश

**मुंबई मुद्रांक अधिनियम, १९५८.**

क्रमांक मुद्रांक. २००३/२०९३/प्र.क्र.४६२/म-१.—ज्याअर्थी, मुंबई मुद्रांक अधिनियम, १९५८ (१९५८ चा मुंबई साठ) (यात यापुढे ज्याचा "उक्त अधिनियम" असा निर्देश करण्यात आला आहे) याच्या कलम ९, खंड (अ) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्र शासनाने, महसूल व वन विभाग, क्रमांक मुद्रांक १०९८/३०६८/प्र.क्र.५९५/म-१, दिनांक २० फेब्रुवारी १९९९ हा आदेश काढला आहे, आणि त्याद्वारे, माहिती व तंत्रज्ञान केंद्रामध्ये शाखा सुरू करण्याकरिता माहिती तंत्रज्ञान युनिटाकडून निष्पादित करण्यात आलेल्या उक्त अधिनियमाच्या

अनुसूची-१ मधील तारणगहाण, हडप, तारण यासंबंधीचा संलेख [अनुच्छेद ६(२)], अभिहस्तांतरणपत्र (अनुच्छेद २५), साधनसामग्री भाडेपट्टयाने देण्यासह भाडेपट्टयाने देण्यासंबंधीचा करारनामा (अनुच्छेद ३६) यांवर उक्त अधिनियमान्वये आकारणी योग्य मुद्रांक शुल्कात सूट दिली आहे आणि त्याशिवाय, उक्त आदेशाखाली मंजूर करण्यात आलेली मुद्रांक शुल्कातील सूट ही, दिनांक ३१ मार्च २००६ रोजी समाप्त होणा-या कालावधीसाठी, सरकारी क्षेत्रातील इन्फर्मेशन टेक्नॉलॉजी पार्क येथील माहिती तंत्रज्ञान युनिटाला मिळू शकेल, असे जाहीर केले आहे. यासाठी पहा महसूल व वन विभाग, आदेश क्रमांक मुद्रांक २०००/४२२९/प्र.क्र.१०६४/म-१, दिनांक ५ मे, २००१.

आणि ज्याअर्थी, विवक्षित फेरबदलांसह मुद्रांक शुल्कात अशी सूट देणे, महाराष्ट्र शासनास इष्ट वाटत आहे ;

त्याअर्थी आता, उक्त अधिनियमाच्या कलम ९, खंड (अ) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून, लोकहितास्तव तसे करणे आवश्यक आहे अशी महाराष्ट्र शासनाची खात्री पटल्यामुळे, ते याद्वारे असे जाहीर करीत आहे की, यापुढे तरतूद केल्याप्रमाणे, उक्त युनिटांना तारणगहाण, हडप, तारण [अनुच्छेद ६(२)], अभिहस्तांतरणपत्र (अनुच्छेद २५), व भाडे पट्टयाने देणे (अनुच्छेद ३६) यांसंबंधीच्या संलेखांवर आकारणीयोग्य असलेल्या मुद्रांक शुल्कात दिनांक ४ जून २००३ रोजी सुरू होणाऱ्या आणि दिनांक ३१ मे २००८ रोजी समाप्त होणाऱ्या कालावधीसाठी सूट देण्यात येत आहे आणि याशिवाय, याद्वारे, सरकारी क्षेत्रातील ''इन्फर्मेशन टेक्नॉलॉजी पार्क'' येथे नवीन युनिट सुरू करण्यासाठी माहिती तंत्रज्ञान युनिटे व माहिती तंत्रज्ञान सहाय्यभूत सेवा युनिटे यांनी निष्पादित केलेल्या संमती-नि-परवानगी (अनुज्ञा) करार [अनुच्छेद ३६(अ)] आणि भाडेपट्टयाचे /अभिहस्तांकित भाडेपट्टयाचे हस्तांतरण (अनुच्छेद ६०) या संलेखावरील आकारणीयोग्य मुद्रांक शुल्कात ९० टक्के सूट देण्यात येत आहे;

**स्पष्टीकरण.**—या आदेशाच्या प्रयोजनार्थ, ''माहिती तंत्रज्ञान युनिट'' आणि ''माहिती तंत्रज्ञान सहाय्यभूत सेवा युनिट'' याचा अर्थ, सरकारी क्षेत्रातील इन्फर्मेशन टेक्नॉलॉजी पार्कमधील युनिट म्हणून विकास आयुक्त (उद्योग) किंवा याबाबतीत त्याने प्राधिकृत केलेला अन्य कोणताही अधिकारी यांच्याद्वारे अशा रीतीने प्रमाणित करण्यात आले आहे, असे युनिट असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**भा. सु. तायडे,**
शासनाचे अवर सचिव.